शैक्षणिक संदर्भ अंक १२४ जून-जुलै २०२०

# जग पालथे घालताना

लेखक : पॉल सालोपेक

अनुवाद : नीलिमा सहस्रबुद्धे

# जग पालथे घालताना

**लेखक : पॉल सालोपेक** **अनुवाद : नीलिमा सहस्रबुद्धे**

*या दुनियेत माणसाला काय काय दिसेल अन काय काय सुचेल त्याला मर्यादा नाही. नॅशनल जिओग्राफिक मासिक वाचताना अशी अतरंगी माणसं भेटतात. त्यातलाच पॉल सालोपेक. हा एक पत्रकार. २०१३ साली त्यानं जग पालथे घालण्यासाठी प्रवास सुरू केला, इथिओपियामधून. साठेक हजार वर्षांपूर्वी आपल्या पूर्वजांनी याच मार्गाने जात वेगवेगळ्या प्रदेशांपर्यंत पोचून, तिथे वस्ती केली होती, असे मानववंशशास्त्र सांगते. त्याच मार्गाने चालत जाण्याचे या माणसाने ठरवले. जॉर्डन, इस्रायल, ताजिकिस्तान, भारत, चीन, अलास्का, अमेरिका आणि शेवटी चिली असा हा प्रवास असेल. सुरुवातीला वाळवंटातून केलेल्या प्रवासाबद्दल त्याच्या लेखाचा हा संक्षिप्त अनुवाद.*

आफ्रिकेमधून मी अरबस्तानात जाईन, पुढे आशियातली मैदाने तुडवत चीनमध्ये. तिथून थेट उत्तरेत सायबेरिया. मग रशियातून जहाजमार्गे अलास्का. अलास्कापासून पुन्हा चालायला सुरवात करणार, ती मानवजातीला सापडलेल्या सर्वांत नव्या खंडाच्या पश्चिम किनाऱ्याने खाली तीएरा द फ्युगोपर्यंत. एकूण ३३,००० किलोमीटर चालणार. मी असं चालायचं ठरवलं त्यामागे बरीच कारणं आहेत... एक तर माणसाच्या खऱ्या वेगानं चालताना मला आपली ही पृथ्वी काय काय सांगतेय, ते समजून घ्यायचेय; सावकाश जगून पाहायचेय, विचार करायचाय, लिहायचेय; यात्राच करायचीय म्हणाना !

आजच्या आपल्या जगण्याच्या अतिवेगामुळे आपले किती तरी महत्त्वाचे लागेबांधे नाहीसे होतात, तिकडे आपलं लक्षच राहत नाही; ते मला दुरुस्त करायचेत. मी चालत राहणार आहे, पुढे काय असेल ते पाहण्यासाठी, जे अनुभवायला मिळेल ते लक्षात ठेवण्यासाठी.

इथिओपियाच्या वाळवंटातल्या पायवाटा या दुनियेतल्या सगळयात जुन्या वाटा आहेत. अजूनही लोक त्यावरून चालतात... गरीब, उपासमारीने हैराण, हवामान बदलग्रस्त, युद्धापासून पळून जाणारे, झोपेतसुद्धा चालत राहतात. आज पृथ्वीच्या पाठीवर १००कोटी लोक स्थलांतराच्या प्रयत्नात आहेत. मानवी इतिहासात हे सर्वात मोठं स्थलांतर आहे. नेहमीप्रमाणेच, नक्की कुठपर्यंत जायचं आहे, ते काही त्यांना स्पष्ट माहीत नाही. जिबुटी शहरात समुद्रकिनारी मी बरेच आफ्रिकन पाहिले, मोबाईलला सिग्नल मिळावा म्हणून त्यांचे तऱ्हेतऱ्हेने प्रयत्न चालू होते. शेजारच्या सोमालिया देशातून फुकटात सिग्नल मिळतो हा त्यांचा अनुभव होता. ओस्लो, मेलबर्न, मिनेसोटा... कुठेकुठे पोचलेल्या लोकांशी त्यांना बोलायचं होतं. ६०,००० वर्षांनंतर आजही आपल्याला आधी चालून गेलेल्या लोकांकडून मार्गदर्शन घ्यायला लागतं, परिस्थितीतून सुटका मिळवण्यासाठी.

हर्टो बॉरी नावाच्या ठिकाणाहून मी चालायला सुरुवात करणार आहे. इथे पुरातन काळातली मानवी हाडे मोठ्या प्रमाणात सापडतात. इथेच १,६०,००० वर्षांपूर्वीच्या माणसाचे जीवाश्म सापडलेले आहेत. आपला अगदी सुरुवातीचा, मोठ्या हाडांचा पूर्वज. या ठिकाणी सध्या कॅलिफोर्निया विद्यापीठातल्या संशोधकांचे काम चालू आहे. त्यांनी मला अश्मयुगीन माणसाची काही हत्यारे दाखवली. आफ्रिकेतल्या माणसांची हत्यारे बाहेरच्या माणसांपेक्षा जास्त चांगली होती, हेही त्यांनी मला सांगितले.

इथल्या स्थानिकांपैकी काही गाईड आणि दोन उंट अशी टीम घेऊन या प्रवासाचा पहिला भाग सुरू होईल. अफार त्रिकोण म्हणून ओळखला जाणारा वाळवंटी भाग पार करून मी आफ्रिकेच्या किनाऱ्याशी जाईन. तिथूनच माणूस आफ्रिकेबाहेर पडल्याचा इतिहास आहे.



**अफार त्रिकोण या वाळवंटी भागाचे नकाशावरील स्थान (स्रोत – विकीपिडिया)**

## दालीफागी, इथिओपिया

अफार लोकांच्या या प्रदेशात पाण्याला सोन्याचे मूल्य आहे. असणारच! दुनियेतल्या सर्वात उष्ण वाळवंटांपैकी हे एक. दरीच्या पश्चिम उतारावरून तीन दिवस चालत होतो, त्या दरम्यान आम्हाला फक्त एक पावसाच्या गढूळ पाण्याचं डबकं सापडलं, ते उंटांची तहान भागवायला उपयोगी पडलं. आणखी एक दिवस प्रवास केल्यावर मात्र पाण्याचा नव्या प्रकारचा साठा मिळाला... दालीफागी गाव.

इथिओपिया, जिबुटी, इरिट्रिया यांच्या किनाऱ्याने जी खारी वाळवंटे आहेत, त्यांचे नकाशेसुद्धा १९२० पर्यंत इथल्या लढवय्या खेडूतांनी काढू दिले नव्हते. आज मात्र रायफली आणि कट्यारींच्यासह त्यांच्याकडे मोबाईल असतात. त्यामुळे त्यांची ताकद वाढते. दालीफागीमध्ये एक डिझेल जनरेटर आहे. दिवसातले सहा तास तो वीज पुरवतो. बाजाराच्या दिवशी येऊन, भटक्या जमातीतले पिकलेले म्हातारे तिथे रांगा लावून साऱ्या गणगोताचे फोन चार्ज करून नेतात.

सहाराच्या दक्षिणेला राहणारे ९० कोटी लोक आज डिजिटल युगात प्रवेश करू इच्छितात. इथे कुणी हौशी प्रवासी येणार नाहीत, की कुणी इथल्या आयुष्याची वर्णनं करणारं काव्य करणार नाही. पण इथलं आयुष्य असं आहे खरं.

## हादरजवळ, इथिओपिया

आम्ही आता वारेन्सोच्या दिशेने चाललो आहे.

तुम्ही जेव्हा तहानलेले असता, तेव्हा तुमचं जग बदलतं. ते आक्रसतं. त्याला खोली उरत नाही. सर्व बाजूंनी क्षितिज जवळ येतं. पृथ्वीच्या गोलावर आकाशाचं झाकण घट्ट बसतं. अगदी कठीण आणि गुळगुळीत असतं ते. वाळवंट तुमच्याभोवती गळफासासारखं आवळलं जातं. तहानलेला मेंदू सगळी अंतरं जवळ आणून कुठे पाणी आहे का ते तपासू लागतो. डोळ्याची भिंगं होतात. बाकी काही महत्त्वाचं नसतंच तेव्हा!



**इथियोपियामध्ये सापडलेली अश्मयुगीन हत्यारे (स्रोत – विकीपिडिया)**

आमचे उंट सामान घेऊन पुढे गेलेत. आम्ही एका संशोधनाच्या जागेकडे चाललोय. २६ लक्ष वर्षांपूर्वीच्या माणसाची दगडी हत्यारे सापडली आहेत तिथे.

आम्ही २० मैल चालून आलोय, पाणी संपलं आहे. काळजी – चिंता... आम्ही अगदी गप्प आहोत, कशाला तोंड सुकवा आणखीन? सूर्यकिरण डोक्याच्या आतपर्यंत पोचत आहेत.

पण आम्हाला चालत राहायला हवं. जर एखाद्या झुडपाखाली बसलो, तर कोणाला दिसणारही नाही... अंतच ओढवायचा! धडपडत चालतोय... तेवढ्यात शेळ्यांचे बारीक बेंबटणे ऐकू येते... म्हणजे जवळ माणसे असणार!

टेकडीवर एक अफार कुटुंब भेटते. दोन हसऱ्या तरुणी आणि चिंध्या ल्यालेली आठ मुले. एक अतिवृद्ध स्त्री, चटईच्या सावलीत बसून काही विणते आहे, अनंत काळापासून. ती म्हणते - बसा, बूट काढा, जरा हाडे पसरा. एका तुटक्या कॅनमधून ती आम्हाला पाणीही देते. पांढरं, गरम, खारं. ते घशाखाली उतरताना साबण प्यायल्यासारखं वाटतं. तरीही आम्हाला ते हवंच आहे. शिवाय ती आम्हाला मूठभर बोरं देते. आईच ती आमची!

साठेक हजार वर्षांपूर्वी जेव्हा इथून आपले पूर्वज बाहेर पडले, तेव्हा बरेच वेगवेगळे भाऊबंद त्यांना भेटले असतील – होमो निअँडरथल, होमोफ्लोरेस, डेनिसोव्हॅन आणि शिवाय भाऊबंद म्हणता येणार नाहीत अशाही काही जाती. ते जेव्हा इतरांना भेटले असतील, तेव्हा काय काय झालं असेल? अन्नपाण्याची देवाणघेवाण, रोटीबेटी व्यवहार... कधी मारामाऱ्या, बलात्कार, लढाया, वंशविच्छेद!

आफ्रिकेबाहेर सर्वत्र मानवी डीएनएमध्ये २.५ टक्के निअँडरथल डीएनए सापडतो. पॅरिसच्या एका संशोधकाला एका विशिष्ट गुहेमध्ये मानवी अवशेषांसह निअँडरथलची हाडेही सापडलीत. त्यावर खाटीकखान्यातल्या हाडांवर असतात तशा खुणा आहेत. (खाण्यासाठी वापर? अजून ते कोडे सुटलेले नाही.) त्या सर्वातून आपली एकच मानवजात शिल्लक राहिली एवढेच आपण आज जाणतो. आपण जग जिंकले, पण मानवाचे कुटुंबीय शिल्लक राहिले नाहीत.

## दुबती, इथिओपिया

आता वाळवंट संपून नवे युग सामोरे येते. डांबरी रस्ता! जिबुटी - इथिओपिया रस्ता. लहान लहान गावं. ट्रक, धूळ, डिझेल, फळ्या ठोकलेली दुकानं, बार…

दुबती गावाच्या जवळ आता उसाची शेतं. मैलोनमैल. कालवे, बंधारे, बुलडोझर, सामानवाहू ट्रक. तेन्दाहो साखर प्रकल्प. इथिओपिया व भारत यांचा कोट्यवधी डॉलर्सचा प्रकल्प. पन्नास हजार मजूर येऊन इथे खपतील, अवाश नदीचं पाणी वापरून इथल्या वाळवंटात ऊस पिकेल. जगभरात विकला जाईल. जगातला सहावा ऊस पिकवणारा देश होण्याची तयारी. इथिओपियाचे परकीय अवलंबित्व कमी होईल. अर्थातच याचे फायदे सर्व जनतेला सारखे मिळतील असं नाही. कंपनीने इथल्या अफार लोकांना जागेवरून उठवलं, पोलीस आले, भांडणं झाली, गोळीबार झाले, रक्त वाहिलं...

ही कथा तर पुरातन काळापासून आपण ऐकत आहोत... डाकोटामधल्या सोन्याच्या खाणी, आयरिश शेतकरी, मेक्सिकोमधले हायवेसाठी हलवलेले शेतकरी... असंख्य कथा, आपण विसरूनही गेलो आता.

जशी वरची माती वाहून जाते, तशा या मानवी प्रगतीच्या भरात होणाऱ्या अन्यायाच्या कथा आपण विसरून जातो. जबाबदारीही विसरून जातो. गावांची उपनगरं होतात, त्यात मूळच्या माणसाला काय काय भोगावं लागतं, ते काही आपण लक्षात ठेवत नाही. सगळी सारखी दिसणारी आणि वेळ हरवून टाकणारी शहरं तयार होतात. आपण फक्त लँडस्केपमधेच त्यांची आठवण ठेवतो. मिलन कुंदेरानं एके ठिकाणी म्हटलं आहे, माणसाचा ताकदीशी लढा म्हणजे आठवण ठेवण्याचा विसरण्याशी लढा.

हिरवंगार दुबती आता माणसांनी भरून गेलंय. नव्या आशा, नव्या आवडी, नव्या महत्त्वाकांक्षा, नवे भविष्य अन नवा इतिहास!

## इथिओपिया जिबुटी सीमेवर

फातुमा डोंगराच्या एका बाजूवर आम्ही पडाव टाकलाय. या कातळावरून पूर्वेला जाणाऱ्या पुरातन वाटा दिसत आहेत. आधी ताजुरा, मग जिबुटी. इथिओपियाच्या वाळवंटापेक्षा कोरडे, उष्ण मैदान, वाळून गेलेल्या तलावांच्या जागी चमकणारे पांढरे मीठ. आणि कुठेतरी शिंदीच्या तळाशी आसरा घेतलेले अफार लोक.



**अफार वाळवंटात उंटांचा तांडा**
**(स्रोत – विकीपिडिया)**

माझ्याबरोबर आलेले मार्गदर्शक आणि उंट घेऊन आलेले लोक आता परत फिरणार. कारण युरोपियन वसाहती झाल्या, तेव्हा इथे देशाची सीमा बदलली. पण ती माझ्याबरोबर आलेल्या अफार लोकांना मान्य नाही... ते म्हणतात, हा आमचा देश आहे, आम्ही येतो पुढेही तुमच्याबरोबर. पण त्यांच्याकडे पासपोर्ट नाही, की काही आयकार्ड नाही. त्यांना परतच जावे लागणार.

## हा चालण्याचा अनुभव कसा होता?

सकाळी डोळे उघडले, की रोज ते नितळ आकाश, तुम्हाला शोषून घेणारं ब्रम्हांडाचं शून्य ! तुम्हाला तुमच्यामधून, तुमच्या शरीरामधून काढून वरती ओढून घेणारं शून्य. अत्यंत

स्पष्टपणे ही भुकेची अनुभूती आहे. वाऱ्याने आपल्यातून वाहून नेलेली, अगदी पारदर्शक. बासरीतून फुंक जाते ना, तशीच. कालच्या दिवसात आम्ही १८ मैल चाललो. खायला एक वाडगा भरून नूडल्स आणि थोडीशी बिस्किटे होती. माझी अंगठीसुद्धा सैल झालीय आता.

या चालण्यादरम्यान तुम्ही साऱ्या शरीराकडून परिसर जाणून घ्यायला शिकता. तुमचे डोळे, कातडी, नाक... उंटाच्या चाऱ्याचा वास समजतो, येणाऱ्या वाऱ्यामधली धूळ समजते आणि अर्थात सर्वात महत्त्वाचा पाण्याचा अदमास येऊ लागतो. सर्वोच्च ताकदीची जैविक स्मृती. तुम्ही चालत राहता, आफ्रिकेची शाश्वतता मागे जात राहते, असं वाटतं की तासाला तीन मैल गेलो तरी तो वेग जास्तच होता. जो प्रवास आपल्या त्या पूर्वजांबरोबर मिळून करायचा होता, तो फार लवकर संपला.

आम्ही चौघे आमच्या प्रवासाचा, आमच्या चांगल्या नशिबाचा विचार करतो, उतारावरून आनंदाने धावत उतरतो. वाटेतल्या कातळावरून येणारा प्रतिध्वनी हिरीरीने अनुभवतो. तिघे अफार आणि जगाच्या पलीकडच्या टोकावरून आलेला मी एकमेकांकडे पाहून मुलांप्रमाणे खिदळतो. तिघेही आता गाऊ लागतात. एखाद्या गंभीर खेळासारखा हा प्रवास होता. मला या सर्वांची फार आठवण येणार आहे.

## अर्दुकोबा लाव्हा प्रदेश

आज प्रवासाचा बेचाळिसावा दिवस. आज वाटेत मृतांशी भेट झाली. लाव्हारसापासून बनलेल्या काळ्या कातळावर आभाळातून पडल्याप्रमाणे काही स्त्रिया आणि पुरुष पडले होते. काहींची तोंडे वर, काहींची खाली. पाच, सहा, सातजण. अंगावर कपडे नाहीत. शेवटच्या क्षणी असह्य वेडामध्ये ते त्यांनी ओरबाडून काढले असतील.

कपडे, पिशव्या, चपला इतस्ततः पडल्या होत्या. उन्हाने रंग उडालेले. कातडी उन्हाने करपलेली. वाळवंटात रात्री हिंडणाऱ्या कुत्र्यांनी हात-पाय तोडलेले. ते इथिओपियाचे असतील किंवा सोमालियाचे, कदाचित काही इरिट्रियाचे. सगळे पूर्वेला एडनच्या आखाताकडे चालले असणार. तिथून काही येमेनी त्यांना बेकायदेशीरपणे मध्यपूर्वेत नेतात, नोकऱ्या मिळवून देतात, शिपायांच्या. असे किती जण स्थलांतर करताना मरण पावतात या त्रिकोणात कोण जाणे. युनोच्या अंदाजानुसार लाखभर तरी लोक दरवर्षी असा प्रयत्न करतात. पोलीस त्यांना पकडतात, काही हरवतात, तहानेने मरतात...



***आफ्रिकेत उत्क्रांत झाल्यानंतर मानवाचा जग पादाक्रांत करणारा प्रवास***

आजवर दुनियेत जन्माला आलेल्या माणसांपैकी ९३% आपल्या आधीच नष्ट झालेत. आपण मिळवलेले बहुतेक विजय आणि आपल्यावर आलेली बहुतेक संकटे आता मागे पडलीत. मी जरी ते जुने प्रवास पुन्हा आठवायला चालत आलो असलो, तरी ते काही पूर्ण खरं नाही. असे काही प्रसंग विसरावेच लागतात. माझ्या सहप्रवाश्यांना ते माहीत आहे. ते मागे वळूनही पाहत नाहीत. मीच डोळे पुसतो आणि चालू लागतो.

दुसऱ्या दिवशी एडनच्या आखातात पोचतो. आफ्रिकेला मागे टाकून आम्ही निघालोय. समुद्रही तसाच निघालाय, येमेन आणि तिहामा किनाऱ्याकडे. त्याच दिशेने पुढे मला जायचेय. लुपिन खोऱ्याकडे, हिमालयात, अनोळखी प्रदेशात, अनोळखी लोकांच्यात…

*२०२०पर्यंत हा प्रवास चालणार होता. त्यापैकी भारतापर्यंतच्या प्रवासाबद्दलचे लेख नॅशनल जिओग्राफिक वेबसाईटवर टाकलेले आहेत. ते जरूर वाचावेत.*

*मूळ लेख* https://www.nationalgeographic.com/magazine/2013/12/out-of-eden/

*मालिकेतील पुढील लेख*

https://www.nationalgeographic.com/magazine/2017/11/further-silk-road-paul-salopek/

https://www.nationalgeographic.com/culture/2019/07/paul-salopek-chronicles-the-mass-migrations-that-define-our-age-feature/

§§§

---

**लेखक : पॉल सालोपेक,** दोन वेळा पुलित्झर पारितोषिकाने सन्मानित झालेले अमेरिकन पत्रकार.

**अनुवाद : नीलिमा सहस्रबुध्दे,** शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इमेल :** neelimasahasrabuddhe@gmail.com